सोबत वित्त विभागाचे "राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट होण्यासंदर्भात स्पष्टीकरण व संबंधित प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.." या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.६८/सेवा-४, दिनांक १०.७.२०१७ ची प्रत सोबत जोडत आहे.

—.—.—.—.—.—.—

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१७/शा२१५५
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 2 2 ...

प्रति,

१) **सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.**
२) **संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.**

**( सुचित्रा रणदिवे )**
**सहाय्यक संचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

जा.क्र.विकाऔ/आस्था/२०१७/3098
दिनांक - 9 OCT 2017

प्रति,
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, वित्त विभाग यांचे **"राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्ती योजना ( DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत ( NPS) समाविष्ट होण्यासंदर्भात स्पष्टीकरण व संबंधित प्रशासकीय विभागांनी करावयाची कार्यवाहीबाबत "** या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक अंनियो-२०१७/प्र.क्र.६८/सेवा४, दिनांक १०.०७.२०१७ ची प्रत सोबत जोडली असून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट होण्यासंदर्भात स्पष्टीकरण व संबंधित प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
### शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१७ /प्र. क्र.६८/सेवा ४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १०/०७/२०१७

वाचा -

१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो-२००५/प्र. क्र.१२६/सेवा ४, दिनांक ३१.१०.२००५

२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो-२०१२/प्र. क्र.९६/सेवा ४, दिनांक २७.०८.२०१४

३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो-२०१५/(NPS)/प्र. क्र.३२/सेवा ४, दिनांक ०६.०४.२०१५

प्रस्तावना-

उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी केंदशासनाच्या धर्तीवर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली. केंद्रशासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होईल असा निर्णय राज्य शासनाने घेतला.राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होतेवेळी योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण व निधी व्यवस्थापकांच्या नियुक्तीबाबत केंद्रशासनाने निर्णय घेतला नव्हता. त्यामुळे राज्य शासनाने राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची स्थापना करून त्यामार्फत सदर योजना कार्यान्वित केली. संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनातील कर्मचा-यांना तसेच महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांना लागू असलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) योजनेबाबतची (स्तर१) ची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना व राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या अनुक्रमे उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ व संदर्भ क्रमांक-२ च्या शासन निर्णयान्वये याआधीच जिल्हा परिषदा,सर्व मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्था,कृषी/कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविदयालये यांना लागू करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने या संस्था ज्या प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त आहेत त्या विभागानी राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) योजनेमध्ये समाविष्ठ होऊन स्तर१ ची कार्यपदधती विहीत करणे क्रमप्राप्त होते.तथापि संबंधित विभागांकडून या प्रकरणी अपेक्षित कार्यवाही झालेली नाही.राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत वेळेत समावेशन न झाल्यामुळे राज्यशासनाला व्याजाचा अनावश्यक आर्थिक भार सोसावा लागत आहे.सबब यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

शासन परिपत्रक -

१. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना जिल्हा परिषदा, सर्व मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी/कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यताप्राप्त व अनुदानित अशासकीय महाविदयालये यांना लागू करण्यात आली आहे.त्यामुळे या संस्था ज्या प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त आहेत ते विभाग म्हणजे १. शालेय शिक्षण विभाग २. उच्च व तंत्र शिक्षण विभाग ३. वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ४. आदिवासी विकास विभाग ५. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग ६. कृषी व पदुम विभाग ७. ग्रामविकास विभाग या विभागांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समावेशनाचा व स्तर -१ ची कार्यपध्दती विहीत करण्याचा शासननिर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे. या विभागांपैकी ग्राम विकास विभाग वगळता इतर विभागांनी अद्याप राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) योजनेमध्ये समावेशनाचा व स्तर १ ची कार्यपदधती विहीत करणे याबाबतचा शासननिर्णय निर्गमित केला नाही. यासर्व विभागांनी ग्राम विकास विभागाने यासंदर्भात दिनांक १३.०६.२०१७ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयाच्या धर्तीवर आपल्या विभागाकरिता याबाबतचा शासन निर्णय तात्काळ निर्गमित करावा.

२. उपरोक्त संदर्भ क्रमांक-२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ नुसार जिल्हा परिषदा,सर्व मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्था,कृषी/कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविदयालये यांच्या सेवेतील कर्मचा-यांच्या नवीन योजनेच्या खात्यात जमा असलेली रक्कम राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे वर्ग करावी असे नमूद केले आहे.तथापि ही रक्कम संबंधित प्रशासकीय विभागांनी परस्पर केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे (NSDL) जमा करावी.

३. दिनांक २७ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ६ नुसार संचालक लेखा व कोषागारे यांची राज्य समन्वय अधिकारी म्हणून तर राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची राज्य समन्वय कार्यालय म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.ही नियुक्ती राज्य शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत आहे.त्यामुळे अनुक्रमांक १ मध्ये नमूद प्रशासकीय विभागांनी या योजनेसाठी त्यांच्या अखत्यारीतील अधिका-यांमधून राज्य समन्वय अधिका-याची (State Nodal Officer) ची नेमणूक करावी.याखेरीज या योजनेंतर्गत DTO,DTA,DDO यांच्या नेमणूका प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील योग्य अशा अधिका-यांमधून करावयाच्या आहेत.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये समावेशन न झाल्यामुळे राज्य शासनाला परिभाषित अंशदान योजनेंतर्गत अंशदानावरील व्याजाची रक्कम दयावी लागत आहे व अनावश्यक आर्थिक भार सहन करावा लागत आहे.सबब या परिपत्रकान्वये संबंधित विभागाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये समावेशन व त्याची कार्यपदधती निश्चित करण्याचा शासन निर्णयाचा मसुदा राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून तपासून घेउन या विभागाच्या सहमतीने शासन निर्णय तात्काळ निर्गमित करावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी..

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०७१०१३१६३४३३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b947f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2017.07.10 13:16:53 +05'30'

(अनुदीप दिघे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर(१००० प्रती),
३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
८) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
९) उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
११) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
१३) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१४) राज्यपालांचे सचिव,
१५) मुख्य मंत्र्यांचे सचिव,
१६) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१७) *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२३) *प्रबंधक, मुंबई महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण /नागपूर/औरंगाबाद
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)

२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुं

२७) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माव पूर्व, मुंबई ४०० ०५१.

२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

२९) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०

३०) कार्यवाह, बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशन, वर्ग क्र.२१, तळ मजला, छबिलदास हायस्कूल, वनम हॉलसमोर, दादर (प), मुंबई-४०० ०२८.

३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन बेळगाव, १०९१, अनंतशयन गल्ली, लक्ष्मी निवास, दुसरा मजला, बेळगांव.

३२) मंत्रालयातील सर्व विभाग,

३३) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

३४) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

३५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

३६) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

३७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

३८) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

३९) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

४०) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),

४१) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),

४२) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४३) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४४) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्र

४५) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),

४६) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

४७) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),

४८) कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१० प्रती),

४९) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा रायगड (१० प्रती),

५०) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (५ प्रती),

५१) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)

५२) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट , मुंबई २० (५ प्रती)

५३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४ (५ प्रती)

५४) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५प्रती)

रिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१७/प्र.क्र.६८

इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्
मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्
शिवसेना, शिवसेना भवन, ग
वित्त विभागातील सर्व कार्या
निवड नस्ती, कार्यासन से
*पत्राद्वारे.

इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)

नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१ (५ प्रती)

शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)

वित्त विभागातील सर्व कार्यासने,

निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

-------------